**छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील नागरीकांच्या जमिनींच्या विविध प्रकारच्या तक्रारींची सखोल चौकशी करण्याकरिता विशेष तपास पथक (SIT) गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग, पहिला मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. एसआयटी-२०२६/प्र.क्र.३७/जमीन-७
दिनांक : ०९ मार्च, २०२६

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनामध्ये "छत्रपती संभाजीनगर शहरातील ब्रिजवाडी येथील गट क्र.३० मधील जमीनीचा गैरव्यवहार." याविषयाबाबत उपस्थित केलेल्या **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ६६६८** अनुषंगाने विधानपरिषद सदस्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तर देतांना मा. मंत्री (महसूल) यांनी " छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील जमिनीच्या विविध तक्रारीवर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (Special Investigation Team) गठित करुन चौकशी करण्यात येईल " असे विधानपरिषदेत आश्वासन दिले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे विशेष तपास पथक गठित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

**शासन निर्णय** :-

छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील नागरीकांच्या जमिनींच्या विविध प्रकारच्या तक्रारींची सखोल चौकशी करण्याकरिता विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे विशेष तपास पथक (Special Investigation Team) गठित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | पथकाची रचना |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर | अध्यक्ष |
| २. | पोलिस महानिरीक्षक, छत्रती संभाजीनगर परिक्षेत्र किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| ४ | पोलिस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| ५ | नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग | सदस्य |
| ६ | उपसंचालक, भुमीअभिलेख, छत्रपती संभाजीनगर विभाग | सदस्य |

०२. तक्रारीचे स्वरुप विचारात घेवुन विशेष तपास पथकाचे अध्यक्ष हे त्या विषयाशी संबधित वरिष्ठ अधिकारी किंवा तज्ञ यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून बोलावू शकतील.

०३. विभागीय आयुक्त यांनी समिती गठित केल्याबाबत जिल्हयातील प्रमुख वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी द्यावी. तसेच नागरिकांना तक्रारी करावयासाठी ०१ महिन्याचा कालावधी द्यावा. नागरिकांच्या तक्रारी विशेष तपास पथकाचे अध्यक्ष म्हणून विभागीय आयुक्त यांच्याकडे मागवून घ्याव्यात.

०४. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

I. छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील जमीन विषयक गंभीर तक्रारी नागरीकांकडून प्राप्त झाल्यानंतर अशा सर्व तक्रारींबाबत सविस्तर चौकशी करणे.

II. चौकशीनंतर पुढील कार्यवाहीबाबत शासनास शिफारस करणे.

III. उपरोक्त विशेष तपास पथकाने चौकशीची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करून त्याप्रमाणे सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०९१९११५५३३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2026.03.09 19:13:03 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

(१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
(२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(३) मा. उपमुख्यमंत्री(नगर विकास) यांचे सचिव
(४) मा. उपमुख्यमंत्री( वित्त) यांचे सचिव
(५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
(६) मा.राज्यमंत्री(महसूल) यांचे खाजगी सचिव
(७) सचिव (१), विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
(८) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
(९) पोलिस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र

(१०) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

(११) नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग

(१२) उपसंचालक, भुमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर

(१३) पोलिस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

(१४) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

(१५) मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक

(१६) निवडनस्ती कार्यासन जमीन-७